आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
७ ऑगस्ट २०२५ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी
- केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या हिताशी कधीही तडजोड करणार नाही, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- संत कबीर हातमाग पुरस्कार सोलापूरचे राजेंद्र अंकम यांना प्रदान
- गडचिरोली जिल्ह्यातल्या काटली गावाजवळ रस्ता अपघातात चार विद्यार्थ्यांचा मृत्यू

**आणि**

- मुंबई विमानतळावर साडे १४ किलो वजनाचा गांजा जप्त

**<><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं आज उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी केली. उपराष्ट्रपती पदासाठीचे उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख २१ ऑगस्ट असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख २५ ऑगस्ट आहे. उपराष्ट्रपती जनदीप धनखड यांनी गेल्या महिन्यात राजीनामा दिल्यामुळे हे पद रिक्त झालं आहे. देशातली उपराष्ट्रपतीपदाची ही १७ वी निवडणूक असून ९ सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे.

**<><><><>**

केंद्र सरकार शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी तसंच शेतीवरचा खर्च कमी करण्यासाठी सातत्यानं काम करत असून शेतकऱ्यांच्या हिताशी कधीही तडजोड करणार नाही, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीत आज हरित क्रांतीचे प्रणेते डॉक्टर एम. एस. स्वामीनाथन यांच्या जन्म शताब्दीनिमित्त आयोजित आंतरराष्ट्रीय संमेलनाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. डॉ. स्वामिनाथन यांनी भारताला अन्नाच्या उत्पादनात स्वयंपूर्ण बनवण्यासाठीच्या चळवळीचं नेतृत्व केलं, असंही मोदी यावेळी म्हणाले.

- **- होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री - -**

- **<><><><>**

विरोधी पक्षाच्या सदस्यांनी विविध प्रश्नांवर केलेली चर्चेची मागणी फेटाळण्यात आल्यामुळे आज संसदेच्या दोन्ही सभागृहात जोरदार गोंधळ झाला. गदारोळामुळे दोन्ही सदनाचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभेचं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं होतं. कामकाज पुन्हा सुरु झाल्यानंतर अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मणिपूर वस्तू आणि सेवा कर सुधारणा विधेयक २०२५ लोकसभेत मांडलं. पीठासीन अधिकारी संध्या रे यांनी प्रश्नोत्तराचा तास पुढे चालवण्याचा प्रयत्न केला, मात्र विरोधकांनी घोषणाबाजी सुरुच ठेवली, अखेर लोकसभेचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

दरम्यान, नगरविकास मंत्री मनोहर लाल यांनी लोकसभेत सांगितलं की, स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत देशभरात १ लाख ५३ हजार कोटी रुपयांचे ७ हजार ३३६ प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

राज्यसभेत विरोधी पक्षांनी दिलेले २५ स्थगन प्रस्ताव उपाध्यक्षांनी फेटाळले. विरोधकांनी त्यावर जोरदार आक्षेप घेत घोषणा द्यायला सुरुवात केली. त्यावर राज्यसभेचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><>**

राज्यात सोयाबीनच्या उत्पादकतेत वाढ व्हावी या उद्देशाने धाराशिव तालुक्यात उपळा इथे एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात येणार आहे. या प्रयोगांतर्गत १० शेतकऱ्यांच्या शेतात स्वयंचलित हवामान केंद्र तर १० शेतकऱ्यांच्या शेतात एआय सेन्सर्स बसवण्यात आले आहेत. या हवामान केंद्रांच्या २० किलोमीटर परिघातल्या शेतकऱ्यांना पाऊस, वातावरणातली आर्द्रता, उष्णता यांची निरीक्षणं एआयच्या माध्यमातून मिळणार आहेत. राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या वतीनं सुरू झालेला हा देशातला पहिला प्रकल्प आहे. या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे हवामान आणि जमिनीची स्थिती याचा अभ्यास करून सोयाबीन पिकावर पडणाऱ्या कीड रोगांचे व्यवस्थापन तसंच पाणी व्यवस्थापन याला मदत होणार आहे.

**<><><><>**

उत्तराखंडमधे उत्तरकाशी इथं ढगफुटी आणि मुसळधार पावसामुळे दरडी कोसळून झालेल्या दुर्घटनेत बचाव कार्य युद्धपातळीवर सुरु आहे. आज सकाळी वातावरण निरभ्र असल्यानं बचावकार्याला वेग आला आहे. गंगोत्री आणि हर्षिल परिसरात वेगवेगळ्या राज्यातले पर्यटक अडकले आहेत. त्यातल्या २७४ जणाची सुटका अतापर्यंत करण्यात आली असून त्यात महाराष्ट्रातले १२३ पर्यटक आहेत. आतापर्यंत हर्षिलमधून १३५ जणांना बाहेर काढण्यात आलं असून त्यातल्या १०० जणांना उत्तरकाशी इथं तर ३५ जणांना डेहराडूनला नेलं आहे. उत्तराखंड राज्य सरकार, इंडोतिबेटन पोलीस दल, राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलं बचावकार्य करत आहेत.

राज्य शासनानं पर्यटकांच्या मदतीसाठी विशेष नियंत्रण कक्ष सुरू केला असून मदत क्रमांक जारी केला आहे तो याप्रमाणे - ९३२१५८७१४३ क्रमांक पुन्हा एकदा ९३२१५८७१४३

**<><><><>**

देश आज अकरावा राष्ट्रीय हातमाग दिन साजरा करत आहे. ब्रिटीशांच्या राजवटीचा विरोध करताना हातमागासह अन्य स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन म्हणून ७ ऑगस्ट १९०५ रोजी सुरू झालेल्या स्वदेशी चळवळीच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. या निमित्ताने केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी आज नवी दिल्लीत संत कबीर हातमाग पुरस्कार आणि राष्ट्रीय हातमाग पुरस्कार प्रदान केले. सोलापूरच्या राजेंद्र सुदर्शन अंकम यांना संत कबीर हातमाग पुरस्कार मिळाला आहे. साडेतीन लाख रुपये रोख, सुवर्णमुद्रा, ताम्रपट, शाल आणि प्रशस्तीपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. सुती वॉल हँगिंग, गालिचे यांच्यावर चित्र विणण्याच्या एकमेवाद्वितीय कौशल्यासाठी अंकम यांना हा पुरस्कार मिळाला आहे. निसर्गचित्र आणि व्यक्तिचित्र अशा दोन प्रकारांमध्ये अंकम विणकाम करतात.

-

हातमाग क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणारे देशभरातले उत्कृष्ट विणकर, विक्रेते, संकल्पनाकार तसंच स्टार्टअप्स आणि उत्पादकांच्या कामाची दखल घेणं हा या पुरस्काराचा उद्देश आहे.

<><><><>

वादग्रस्त न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना पदावरुन हटवण्यासंदर्भात नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीच्या निर्णयाला आव्हान देणारी वर्मा यांची याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली आहे. न्यायमूर्ती दीपांकर दत्त आणि न्यायमूर्ती ए. जी. मसीह यांनी सांगितलं की, वर्मा यांना, अंतर्गत समितीच्या चौकशी प्रक्रीयेत सहभागी झाल्यानंतर समितीच्या निर्णयाला आव्हान देता येणार नाही.

न्यायमूर्ती यशवंत वर्मा दिल्ली उच्च न्यायालयात असताना त्यांच्या घराच्या आवारात मोठ्या प्रमाणात रोकड आढळल्यामुळे वादग्रस्त ठरले आहेत.

<><><><>

मुंबईतल्या विमानतळ आयुक्तालयाच्या अधिकाऱ्यांनी साडे १४ किलो वजनाचा गांजा जप्त केला आहे. याची किंमत अंदाजे १४ कोटी ५० लाख रुपये इतकी आहे. याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर ५ ऑगस्टच्या रात्री एक संशयीत प्रवासी अधिकाऱ्यांना आढळून आला. त्याची तपासणी केली असता त्याच्याकडे साडे १४ किलो वजनाचा गांजा सापडला.

<><><><>

गडचिरोली जिल्ह्यातल्या काटली गावाजवळ आज सकाळी झालेल्या अपघातात चार विद्यार्थी एका ट्रकच्या धडकेत मृत्यूमुखी पडले. तर अन्य दोघे जखमी झाले. त्यानंतर संतप्त नागरिकांनी हा महामार्ग रोखून धरला. या अपघातात जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी हवाईमार्गे नागपूरला नेण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. जखमींच्या उपचाराचा खर्चही राज्यशासन करणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

जम्मू काश्मीरमधे उधमपूर इथं आज केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या वाहनाला झालेल्या अपघातात ३ जवान ठार झाले असून इतर १५ जण जखमी झाले आहेत. या जवानांना घेऊन जाणारी बस रस्त्यावरून घसरुन खोल दरीत कोसळून हा अपघात झाला. जवानांची १८७ बटालियन बसंत घर इथली कारवाई करुन परतत असताना उधमपूर जिल्ह्यातल्या कांदवा इथं हा अपघात झाला. या वाहनात एकूण २३ जवान होते. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><>**

गोरक्षणाच्या नावाखाली भाकड जनावरांच्या वाहतुकीला अडथळे आणून वाहतूक करणाऱ्यावर खोटे गुन्हे दाखल करण्याच्या वाढत्या प्रकारांना आळा घालण्याचं आवाहन कुरेशी आणि खाटीक समाजानं केलं आहे. पशुपालकांना होणारा हा त्रास थांबवावा. या मागणीसाठी आज सोलापूरात कुरेशी समाज, खाटीक समाज तसंच पशुपालकांनी मूक मोर्चा काढला. सर्व सामाजाचे नागरिक या मोर्चात मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कराची साडेसातशे कोटी रुपयांची बनावट चलान बनवण्याच्या आरोपाखाली सक्तवसुली संचालनालयाने राज्यात विविध ठिकाणी छापे टाकले. बनावट वित्तीय संस्था आणि अनधिकृत वित्तीय दूरचित्रवाहिन्यांशी संबंधित प्रकरणात ही कारवाई करण्यात आल्याचं सूत्रांनी सांगितलं. महाराष्ट्र, झारखंड आणि पश्चिम बंगालमधे मिळून एकूण १२ ठिकाणी आज छापे टाकण्यात आले.

**<><><><>**

बीड विधानसभा मतदारसंघातल्या महामार्गासाठी जमीन संपादित केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला द्यावा, अशी मागणी आमदार संदीप क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे केली. याबाबात तत्काळ निर्णय घेण्याचे आदेश पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. अजित पवार हे दोन दिवसांच्या बीड दौऱ्यावर आहेत.

**//<><><><>//**